# प्रकरण - १

# प्रकरण १
# प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर काळातील भारताला लोककल्याणकारी राज्याची भूमिका ही यशस्वीरित्या पार पाडता यावी म्हणूनच भारतीय घटनेतील स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वाबरोबरच लोकशाही शासनव्यवस्था आणि समाजवादी अर्थव्यवस्थेची तरतूद केली आहे. भारताने स्वीकारलेल्या या विशाल दृष्टिकोनामुळेच राज्याचे कार्यक्षेत्र हे अधिक व्यापक स्वरूपाचे बनले. आर्थिक क्षेत्रातील उत्पादन, वितरण, नियंत्रण आगि भांडवल पुरवठा अशा बहुविध स्वरूपाच्या कार्याची जबाबदारी ही खात्यामार्फत घटक राज्याला पार पाडणे कठीण झाले आहे. म्हणूनच आर्थिक क्षेत्रातील विविध प्रकारच्या प्रशासकीय संघटना अस्तित्वात आल्या. भारतासारख्या विकसनशील व लोककल्याणकारी राज्याला तर अशा प्रशासकीय संघटनाची (महामंडळाची) अधिक गरज आहे. त्यातूनच राज्यनिर्मित प्रमंडळाची (महामंडळाची) निर्मिती कायद्याद्वारे झाली.

**विकासात्मक महामंडळाच्या व्याख्या**

महामंडळाच्या व्याख्या अनेक विचारवंतांनी केलेल्या आहेत. त्यामधील काही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

प्रो. एल. डी. व्हाईट यांच्या मते -

"उद्योग व व्यापार विषयक क्षेत्रात राज्याने केलेल्या प्रवेशामुळे झालेला परिणाम म्हणजे राज्यनिर्मित महामंडळ होय."[१]

या विचारवंताच्या मते महामंडळ केवळ उद्योग व व्यापारापर्यंत मर्यादित आहेत. ही व्याख्या अत्यंत मर्यादित स्वरूपाची आहे तर काही काळानंतर प्रो. जे. एम. फिफनर यांनी त्यांच्या विचारात परिवर्तन आणून खालीलप्रमाणे व्याख्या मांडली.

"जेव्हा अनेक व्यक्तींना एक व्यक्ती म्हणून कार्य करता येईल या हेतूने एखादी संस्था निर्माण केली जाते तेव्हा त्यास विकासात्मक महामंडळ असे म्हणतात."[२]

विकासात्मक महामंडळ ही एक कृत्रिम व्यक्ती असते व जिला कायद्याद्वारे विशिष्ट कार्य करण्यासाठी अधिकार सत्ता प्राप्त झालेली असते. भारतातील प्रो. एम. सी. शुक्ला यांच्या मते

"विकासात्मक महामंडळ म्हणजेच अशी संयुक्त संस्था की जी कायदेमंडळाद्वारे निर्माण होते व जिचे अधिकार व कार्य कायद्यानुसार निश्चित केले जाऊन ती संस्था आर्थिकदृष्टीने स्वतंत्रपणे एखाद्या विशिष्ट क्षेत्रापुरते किंवा एखाद्या विशिष्ट व्यवसायापुरते स्पष्ट व मर्यादित स्वरूपाचे कार्य करीत असते."[३] असे विचार एम. ई. डिमॉक यांच्या व्याख्येमध्ये फार पूर्वी आढळलेले आहे. त्यांच्या मते

"एखाद्या विशिष्ट व्यवसायासाठी किंवा आर्थिक कार्यासाठी मध्यवर्ती सरकारच्या किंवा घटक राज्य सरकारच्या किंवा स्थानिक सरकारच्या कायद्याद्वारे अधिकार देण्यात आलेल्या सार्वजनिक उद्योगधंद्याना विकासात्मक महामंडळ असे म्हणतात."[४]

हेरॉल्ड सीडमन यांच्या मते

"सरकारी महामंडळ म्हणजे सार्वजनिक उद्देश प्राप्तीसाठी राज्य संस्थेच्या कायद्यानुसार अधिकृतपणे निर्माण केलेल्या संघटित संस्था होत."[५]

डिमॉक यांनी व्याख्येत विशिष्ट व्यवसायासाठी किंवा आर्थिक कार्यासाठी प्रत्येक स्तरावर सरकारच्या कायद्याद्वारे अधिकार देण्यात आले आहेत ते स्पष्ट केले. तर सीडमन यांनी आपल्या व्याख्येत सार्वजनिक उद्देश प्राप्तीसाठी कायद्यानुसार निर्माण केलेल्या संस्थांना महत्त्व दिले.[६]

**विकासात्मक महामंडळाची उद्दिष्टे**

कोणत्याही बाबीची निर्मिती ही विशिष्ट उद्दिष्टाच्या पूर्ततेकरिता केलेली असते. त्याचप्रमाणे विकासात्मक महामंडळाची निर्मिती ही विशिष्ट उद्दिष्टाच्या पूर्ततेचा हेतू डोळ्यासमोर ठेवूनच केलेली आहे. त्यापैकी काही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. लोकांना कर्जपुरवठा करण्यासाठी, कर्जासंबंधीच्या इतर सोयी उपलब्ध करून देण्यासाठी काही महामंडळांची निर्मिती केली जाते. उदाहरणार्थ औद्योगिक वित्त महामंडळ

२. काही विशिष्ट उद्योगधंद्यांचे, व्यापार विषयक उद्योगधंद्याचं संचालन आणि व्यवस्थापन करण्यासाठी काही महामंडळांची निर्मिती केली जाते. उदाहरणार्थ गृहनिर्माण महामंडळ

३. एखाद्या विशिष्ट प्रदेशाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी काही विकासात्मक महामंडळे निर्माण केली जातात. उदा. दामोदर घाटी निगम

४. एखाद्या विशिष्ट समाजाचा (जाती जमाती) सर्वांगीण विकास साधण्यासाठी काही विकासात्मक महामंडळे निर्माण केली जातात. उदाहरणार्थ महाराष्ट्र सहकारी आदिवासी विकास महामंडळ

वरील उद्दिष्टाच्या पूर्ततेकरिता शासनाने निरनिराळी विकासात्मक महामंडळे ही निर्माण केली आहेत. त्यापैकी चौथ्या म्हणजेच जातीपातीच्या बंधनांनी जखडलेल्या आणि शेकडो वर्षाच्या गुलामगिरी उपभोगलेल्या समाजाच्या सर्वांगीण उन्नतीकरिता म्हणजेच महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, नवबौध्द व विमुक्त भटक्या जमातीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, कमकुवत व दारिद्रयरेषेअंतर्गत जीवन जगत असणा-या समाजाचा जलद गतीने विकास घडवून आणणे, याच उद्देशाने महाराष्ट्रात ह्या विकासात्मक महामंडळाची निर्मिती करण्यात आली आहे.[७]

सामान्यत: ही विकासात्मक महामंडळे तीन प्रकारची असतात.

१. शासकीय महामंडळ

२. मिश्र स्वरूपाचे महामंडळ

३. खाजगी महामंडळ

## १. शासकीय महामंडळ

ह्या महामंडळामध्ये संपूर्णत: सरकारचे भागभांडवल गुंतलेले असते व त्यावर सरकारचेच पूर्ण नियंत्रण असते. त्यांना शासकीय महामंडळ असे म्हणतात.

## २. मिश्र स्वरूपाचे महामंडळ

ह्या महामंडळामध्ये काही प्रमाणात सरकारचे भांडवल गुंतलेले असते आणि पुष्कळसे भांडवल खाजगीरित्या गुंतवलेले असते. त्यावर सरकारी आणि खाजगी व्यक्ती यांची मालकी असते व त्याचे नियंत्रण खाजगी आणि शासकीय व्यक्तीकडूनच होते. त्यांना मिश्र स्वरूपाची महामंडळे असे मानले जाते.

## ३. खाजगी महामंडळ

ह्या महामंडळात भांडवलाचा पुरवठा खाजगीरित्या केला जातो. पण ती राज्याच्या कायद्यानुसार निर्माण झालेली असतात. त्यांना खाजगी महामंडळ असे म्हणतात. ह्या महामंडळावर सरकारचे प्रतिनिधी नसतात पण त्यांच्या कार्यावर सरकारचे देखरेख व नियंत्रण अंशत: असते.

भारतातील अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणासाठी असलेले विकासात्मक महामंडळ हे शासकीय महामंडळ आहे. ते पूर्णत: शासकीय भागभांडवलावर चालविले जात आहे आणि ते अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणासाठी विकासात्मक भूमिका नेहमी पार पाडत आहे.

महाराष्ट्रातील आदिवासीच्या विकासासाठीही शासनाने महाराष्ट्र सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना केलेली आहे. हे महामंडळ महाराष्ट्र राज्यातील आदिवासी समाजाचा विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने निर्माण केले आहे.

शासनाने अस्पृश्य समाजाला समाजातील इतर घटकांच्या बरोबरीचे स्थान मिळवून देण्यासाठी या अस्पृश्यांना (मागासवर्गीय) शिक्षणात, नोक-यात, शासकीय सहभागात तसेच त्यांचा आर्थिक दर्जा उंचावण्यास अनेक प्रकारच्या सोयी सवलती दिल्या आहेत. शिवाय या प्रयत्नामधीलच एक भाग म्हणजेच शासनाने निर्माण केलेले हे विकासात्मक महामंडळ होय.[८]

अशा या विकासात्मक महामंडळाची वैशिष्ट्ये ही पुढीलप्रमाणे वर्णन करता येतील.

१. ही महामंडळे कायदेमंडळाने पास केलेल्या विशेष कायद्यानुसार निर्माण केलेली असतात. त्यात त्यांचे अधिकार, कार्य, जबाबदा-या, स्वतंत्रता इ. चे स्पष्टीकरण असते.

२. महामंडळ विशिष्ट उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी निर्माण केलेले असल्याने त्या कार्यक्षेत्राशिवाय इतर क्षेत्रात कार्य करण्याची सत्ता ही महामंडळाला नसते.

३. विकासात्मक महामंडळे ही कायदेशीरदृष्ट्या कृत्रिम व्यक्तीसारखी असतात. विकासात्मक महामंडळावर न्यायालयात दावा दाखल करता येतो अथवा कोणतीही व्यक्ती, संस्था ही महामंडळावर दावा दाखल करू शकते.

४. विकासात्मक महामंडळाना संस्था, संघटनांबरोबर करार करण्याचा, स्वतःची मालमत्ता बाळगण्याचा व खरेदी करण्याचा अधिकार आहे.

वरील वैशिष्ट्ये ही विकासात्मक महामंडळाची असून ही महामंडळे विकासात्मक कार्याबरोबरच किरकोळ नफ्याच्या हेतूनेही कार्य करीत आहेत.[१]

शासनामार्फत जरी विकासात्मक महामंडळाची ध्येयधोरणे ठरविली जात असली तरीही विकासात्मक महामंडळाना आपल्या दैनंदिन कामकाजात आणि दैनंदिन प्रशासनात पूर्णपणे स्वतंत्रता लाभलेली असते. कार्यकारी संचालकाकडून किंवा संचालक मंडळाकडून दैनंदिन प्रशासनाची जबाबदारी पार पाडली जाते.

विकासात्मक महामंडळांना आर्थिक स्वातंत्र्यही लाभलेले असते. राष्ट्रीय अंदाजपत्रकात विकासात्मक महामंडळांच्या आर्थिक व्यवहाराचा काहीही उल्लेख नसतो, तर विकासात्मक महामंडळे ही स्वतंत्रपणे आपली आर्थिक व्यवस्था ठेवीत असतात. शिवाय या विकासात्मक महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक सरकार मार्फत अथवा लोकसेवा आयोगामार्फत केली जात नाही तर विकासात्मक महामंडळांना कर्मचारी निवडीचे स्वातंत्र्य आहे. भरती-बढती, सेवानिवृत्ती इत्यादी बाबी खाजगी,

व्यावसायिक संघटनेप्रमाणेच विकासात्मक महामंडळात केल्या जातात. विकासात्मक महामंडळ स्वत:चे भांडवल उभारू शकते. पैशाची बचत करू शकते, कर्ज घेऊ शकते, कर्ज देऊ शकते. विकासात्मक महामंडळाचा हिशोब सरकारी ऑडिटच्या नियमाप्रमाणे न तपासता, व्यापारी दृष्टिकोनातून त्यांच्या तपासण्या केल्या जातात. नफा-तोटा, अनाठायी खर्च, विकासात्मक महामंडळाची आर्थिक स्थिती इत्यादी गोष्टीवर भर देऊन विकासात्मक महामंडळाच्या हिशोबांची तपासणी केली जाते.

विकासात्मक महामंडळे आपल्या कार्यात गतिशीलता, कार्यक्षमता (सुकरता) आणण्यासाठी नियम करू शकतात, त्यात बदल करू शकतात, नवीन विभाग करू शकतात, उपविभाग वाढवू शकतात, परिस्थितीनुसार,गरजेनुसार कार्यपध्दतीत बदल करून विकासात्मक महामंडळेही नफ्याच्या भूमिकेतून लोकहिताच्या दृष्टीने कार्य करीत असतात.

सैध्दांतिकरित्या विचार केल्यास विकासात्मक महामंडळावर कोणत्याही पक्षीय राजकारण, पक्षीय दडपणाचा परिणाम होऊ नये, तर ह्या विकासात्मक महामंडळाचा प्रशासकीय विभाग हा राजकीय क्षेत्रापासून अलग राहून कार्य करण्याची अपेक्षा असते. तसेच गुणात्मकदृष्ट्या पूर्णपणे स्वतंत्ररित्या निर्णयही विकासात्मक महामंडळ घेत असतात. परंतु वस्तुस्थितीत सत्तारुढ पक्षाचे वर्चस्व संचालक मंडळाच्या सदस्यामार्फत काही प्रमाणात असते.[१०]

विकासात्मक महामंडळाची निर्मिती ही कायदेमंडळाच्या कायद्यानुसार झालेली असल्यामुळे विकासात्मक महामंडळावर काही अंशी कायदेमंडळाचेही नियंत्रण असणे अपरिहार्य ठरते. मात्र त्यांचे हे नियंत्रण त्यांच्या दैनंदिन कामकाजाबाबत न राहता, त्यांच्या कामकाजाबाबत प्रश्न उपप्रश्न विचारून, कायद्याच्या अधिनियमात बदल करून, वार्षिक अहवालावर चर्चा करून विचारविनिमय होऊन, त्यांच्या विधेयकावर, करारावर व वार्षिक अंदाजपत्रकावर चर्चा करून नियंत्रण ठेवले जाते. परंतु विकासात्मक महामंडळाच्या स्वातंत्र्यावर आघात होईल असे प्रश्न विचारले जात नाहीत, आणि प्रश्नाचे स्वरूप सामान्य धोरणाशीच संबंधित असते.

महाराष्ट्रात अनुसूचित जाती जमातीचे लोक मोठ्या संख्येने राहतात. आता महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नवबौध्दांची संख्या किती आहे याची माहिती घेऊया.

**तक्ता क्रमांक १.१**

**महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येमधील अनुसूचित जाती व जमातीची आकडेवारी**

| वर्ष | एकूण लोकसंख्या | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | नवबौध्द |
|---|---|---|---|---|---|
| २०००-०१ | एकूण | ९,६८,७८,६०० | ९८,८१,६६५ | ८५,७७,२७६ | ५८,३८,७१० |
| | पुरुष | ५,१०,६७,५७८ | ५०,५८,७६९ | ४३,०७,५२८ | २९,५८,७५४ |
| | स्त्रीया | ४,६८,११,०२२ | ४८,२२,८९६ | ४२,६९,७४८ | २७,७९,९५६ |

संदर्भ : महाराष्ट्र जनगणना अहवाल, २००१

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीच्या तुलनेने अनुसूचित जातीची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. म्हणूनच वरील समाजाचा सर्वांगीण विकास घडून येण्यास मदत व्हावी याच प्रामाणिक हेतूने शासनाने अनेक थोर समाजसेवकांच्या नावाने खालीलप्रमाणे मागासवर्गीय विकासात्मक महामंडळे निर्माण केली आहेत.[११]

१. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित, मुंबई (१९७८)

२. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई (१९८२)

३. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई (१९८५)

४. संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई (१९८८)

५. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ लि. (१९९९)

याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन केलेली आहे.

उपरोक्त पाचही विकासात्मक महामंडळे ही राज्यातील अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय समाजाच्या उन्नतीकरीता विविध कल्याणकारी योजना राज्यात राबविते. याशिवाय ही विकासात्मक महामंडळे खालील नमूद केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील महामंडळाच्या योजनाही राबवितात.

१. राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (एन. एस. एफ. डी. सी.)

२. राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (एन.बी.सी. एफ.डी.सी.)

३. राष्ट्रीय अल्पसंख्याक वित्त आणि विकास महामंडळ, नवी दिल्ली

४. राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली

५. राष्ट्रीय विकलांग वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली

उपरोक्त पाचही विकासात्मक महामंडळे राष्ट्रीय स्तरावरील विकासात्मक महामंडळे असली तरीही या विकासात्मक महामंडळांच्या योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्यासाठी "वाहिनीकृत यंत्रणा" म्हणून महाराष्ट्र राज्यातील विकासात्मक महामंडळे कार्य करीत आहेत.

विकासात्मक महामंडळाच्या कार्ये व भौगोलिक परिस्थितीवरून विभाग, उपविभाग पाडून प्रशासनातील विकेंद्रीकरणाचे तत्त्व अनुसरून महाराष्ट्र राज्यातील विकासात्मक महामंडळाची प्रादेशिक कार्यालये ही मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर येथे कार्यरत आहेत. जिल्हा पातळीवर म्हणजेच महाराष्ट्रातील सर्व ३५ जिल्हयात, जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा कार्यालयेही कार्यरत आहेत. जिल्हयातील या जिल्हा कार्यालय प्रमुखांचे कार्य जिल्हा व्यवस्थापक पाहत असतात तर त्या त्या प्रदेशाचे प्रादेशिक व्यवस्थापक हे प्रादेशिक स्तरावरील काम पाहत असतात. तसेच त्यांच्या कामात मदतीसाठी आवश्यक असणारा पुरेसा शासकीय व प्रशासकीय कर्मचारी वर्गही त्यांना उपलब्ध करून दिला जातो. ह्या विकासात्मक महांडळाची उद्दिष्ट्ये अनुसूचित जाती जमातीकरीता देण्यात येणा-या सोयी ह्या पुढीलप्रमाणे वर्णन करता येतील.[१२]

**उद्दिष्टे**

१. अनुसूचित जाती, नवबौध्द, विमुक्त व भटक्या जमातीचा सर्वांगीण विकास घडवून आणणे.

२. अनुसूचित जाती जमातीना उद्योग व्यवसाय उभारणीस मदत करणे, आत्मनिर्भर बनविणे.

३. अनुसूचित जाती जमातीतील विद्यार्थ्यांना आय. ए. एस. आणि आय. पी. एस. या स्पर्धात्मक परीक्षांसाठी प्रोत्साहित करणे.

४. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणा-या अनुसूचित जाती जमातीचे जीवनमान उंचावणे.

५. अनुसूचित जाती जमातीतील विद्यार्थ्यांना आवश्यक ते तंत्रविषयक प्रशिक्षण देऊन शेती अनुषंगिक व्यवसाय, उद्योगधंदे व व्यापार या क्षेत्रात स्वयंरोजगार उभारणीस मदत करणे.

६. अनुसूचित जाती जमातीतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीस प्रोत्साहित करून त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे.

७. अनुसूचित जाती जमातीतील महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी, सक्षम आणि आत्मनिर्भर बनविणे.

**सोयी**

१. आर्थिक सहाय्य (अनुदान)

२. व्यवसाय/उद्योग उभारणीसाठी कर्ज

३. व्यावसायिक प्रशिक्षण

४. व्यावसायिक, अभियांत्रिकी शिक्षणासाठी कर्ज

५. फी व्यतिरिक्त विद्यावेतन

६. शिष्यवृत्ती/पुरस्कार (गुणवत्तेनुसार)

७. उच्च शिक्षणासाठी कर्ज

वरील सेवा आणि उद्दिष्टांच्या पूर्ततेची जबाबदारी ही राज्यातील व्यवस्थापकीय संचालक, प्रादेशिक व्यवस्थापक आणि जिल्हा पातळीवरील जिल्हा व्यवस्थापक या प्रशासकीय अधिका-यांची असते. प्रशासनातील अधिकारपद परंपरेच्या तत्त्वानुसार हा प्रशासकीय अधिकारी वर्ग आपल्या कार्याप्रतीची जबाबदारी पार पाडीत असतो. याशिवाय राज्यातील विकासात्मक महामंडळाच्या प्रशासकीय अधिका-याला पुढील जबाबदारीही पार पाडावी लागते.

१. लोकसंख्येचा सर्व्हे करून लाभधारकांच्या नोंदी करणे.

२. लाभधारकांना विकासात्मक महामंडळाच्या योजनेचा लाभ मिळवून देणे.

३. महाराष्ट्र शासनामार्फत मिळणा-या अनुदान योजनांचा लाभ हा लाभधारकांना मिळवून देणे.

४. महामंडळाच्या सभा घेणे.

५. दप्तर व अहवाल ठेवणे.

वरील जबाबदा-या पार पाडण्यासाठी प्रशासकीय अधिका-यांना आपापल्या कार्यक्षेत्राबाबतचे लागणारे स्वातंत्र्य हे त्यांना लाभलेले असते. त्यामुळे त्यांना आपले कार्य अधिक सक्षम व कार्यक्षमरित्या पार पाडण्यास मदत होते. या सर्व गोष्टींचा विचार करून महाराष्ट्रातील अद्यापही वरील नमूद केलेल्या महामंडळावर संशोधन झालेले नाही. म्हणून प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.[१३]

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. मागासवर्गीयांसाठीच्या विकासात्मक महामंडळाच्या योजना राबविण्यासाठी उभ्या केलेल्या प्रशासकीय यंत्रणेचे स्वरूप व योजना पध्दतीचा अभ्यास करणे.

२. मागासवर्गीयांसाठी विकासात्मक महामंडळ, कोल्हापूर जिल्हा क्षेत्रातील या कार्यक्रमाची, योजनांची आणि त्यांच्या अंमलबजावणीची तपासणी करून हा कार्यक्रम कोणत्या दिशेने राबविला जातो आहे याचा अभ्यास करणे.

३. या योजनांचा आणि लाभ घेतलेल्या लाभधारकांचा व प्रशासकीय सेवेतील योजना प्रक्रियेशी निगडीत असलेल्या अडीअडचणीबाबत विचार करणे.

४. अडीअडचणीबाबत केलेल्या उपाययोजनांची सविस्तर चर्चा करणे.

५. या योजनांची अधिकाधिक कार्यक्षमरित्या अंमलबजावणी होण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

६. या विकासात्मक महामंडळाला योजना राबविण्यात प्रगतीचा पल्ला कितपत गाठता आला याचा अभ्यास करणे.

७. या योजनेचा लाभ घेतलेल्या लाभधारकांचा आदर्श समाजातील इतर व्यक्तींसमोर ठेवून त्यांना या योजनांचा लाभ घेण्यास प्रेरित करणे.

**संशोधन पध्दती व माहिती**

हे अध्ययन व्यष्टी अध्ययन स्वरूपाचे आहे. अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणास्तव विकासात्मक महामंडळ या विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक तथ्य संकलन महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळातील महत्त्वाचे प्रशासकीय अधिकारी वर्ग (३०) म्हणजेच व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक, प्रकल्प व्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, जिल्हा व्यवस्थापक, फायनान्स मॅनेजर व अध्यक्ष यांची मुलाखत घेऊन माहिती संग्रहित केली आहे. याशिवाय वरील पाचही महामंडळांचे संचालक मंडळ यांच्या मुलाखती घेऊन माहितीचे संकलन केले आहे. कोल्हापूर जिल्हयातील मागासवर्गीयांची सांख्यिकीय आकडेवारी ही अत्यंत उपयुक्त अशी ठरली. कोल्हापूर जिल्हयातील विकासात्मक महामंडळांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या कामकाजाची पाहणी केलेली आहे. तसेच महामंडळाच्या सभांना उपस्थित राहून माहिती घेतली.

दुय्यम तथ्य संकलनाच्या साधनामध्ये माहितीसाठी केंद्र व राज्य शासनाचे वार्षिक अहवाल, उपलब्ध माहितीपुस्तके, मासिके, नियतकालिके, वृत्तपत्रातील माहितीचा वापर, महामंडळाच्या जमाखर्चाच्या रक्कमांची माहिती, तक्ते, नकाशे तसेच छायाचित्रणाचाही वापर केला आहे.

वरील उल्लेख केलेल्या माहितीच्या आधारे संशोधन निबंधाची बांधणी खालील नमूद केलेल्या प्रकरणांचे अंतर्गत केलेली आहे.


प्रकरण १ : प्रस्तावना

प्रकरण २ : कोल्हापूर जिल्हा : एक दृष्टिक्षेप

प्रकरण ३ : महाराष्ट्रातील अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणास्तव विकासात्मक महामंडळ

प्रकरण ४ : विकासात्मक महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजना व कार्यक्रमाचे परीक्षण

प्रकरण ५ : विकासात्मक महामंडळाचे दुर्बल घटकांसाठी योगदान

प्रकरण ६ : समारोप व शिफारसी

## संदर्भ सूची


१. पाटील बी. बी., 'लोकप्रशासन', फडके प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती, १९९५, पृ. ८८

२. पाटील बी. बी., 'लोकप्रशासन', फडके प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती, १९९५, पृ. ८९, ९०

३. भोगले, शा. कृ. आणि पाटील बी. बी., 'लोकप्रशासन', द्वितीयावृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ. ९२, ११५

४. भोगले, शा. कृ., 'लोकप्रशासन', प्रथमावृत्ती, १९९३, पृ. ११५, ११६

५. पाटील बी. बी., 'लोकप्रशासन', द्वितीयावृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९५, पृ. ९३, ९४

६. भोगले, शा. कृ., 'लोकप्रशासन', प्रथमावृत्ती, १९९३, पृ. ११७, ११८, ११९

७. पाटील बी. बी., 'लोकप्रशासन', द्वितीयावृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९५, पृ. ९४

८. पाटील बी. बी., 'लोकप्रशासन', द्वितीयावृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९५, पृ. ९६

९. इनामदार, ना. र., 'लोकप्रशासन', पुणे, पृ. ९५

१०. पाटील बी. बी., 'लोकप्रशासन', द्वितीयावृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९५, पृ. ९९७, ९८

११. महाराष्ट्र राज्य जनगणना अहवाल, २००१

१२. विकासात्मक महामंडळाच्या माहितीपुस्तिका, पृ. १, २

१३. विकासात्मक महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांची मुलाखत दि. १९/१/२००६